**सुर्यकांत रामचंद्र बांदेकर वि.**
**प्रदीपकुमार तुकाराम बांदेकर**

## निशाणी क्रमांक ६१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचेविरुध्द पारीत झालेला 'एकतर्फा आदेश' रद्द होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या मते, ते मुंबई येथे वास्तव्यास असल्याने त्यांना मध्यंतरीच्या कालखंडात आपल्या वकीलांना भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. कैफियत दाखल न करण्यामागे प्रतिवादींचा कोणताही उद्देश नव्हता. प्रतिवादी क्र. २ व ३ यांना कायदयाचे ज्ञान नाही. प्रतिवादी क्र. २ व ३ यांचेविरुध्द पारीत एकतर्फा आदेश रद्द न झालेस त्यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणार असे अपरिमित नुकसान होणारे आहे आणि त्यांना न्यायाला मुकावे लागणार आहे. सबब, त्यांच्याविरुध्द पारीत केलेला एकतर्फा आदेश रद्द करणेची विनंती प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी नि.६९ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी वेळेत हजर न झाल्याने सदरचा आदेश झालेलाआहे. प्रतिवादी यांना योग्य ती संधी देण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी दाव्याचे कामी विलंब करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेकडे एकत्रीतपणे अखत्यारपत्र असून देखील प्रस्तुत कामी वेळेत हजर झालेले नाहीत. दाव्यास विलंब होण्याकरीता जाणुनबुजून विलंबाने दाव्यात हजर झालेले आहेत. अर्जात योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रस्तुत

दाव्याचे कामी समन्सची बजावणी होऊन देखील हजर न झालेने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी हजर होऊन त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा असा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी क्र.२ व ३ यांची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ व ३ यांना संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र.२ व ३ यांची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादी यांनी आपल्या कथनांच्या पुष्ठयर्थ प्रस्तुत अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रस्तुतचा नि.६१ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ विरूध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.२ व ३ यांची कैफियत अभिलेखावर नोंदविण्यात यावी.

४. उभय पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.07.10 12:01:58 +0530

दिनांक:- ०८/०७/२०२५ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण:- सांवतवाडी सह दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),

सावंतवाडी